अत्यंत महत्त्वाचे

# University of Mumbai

Quality Assurance
(Statistical Cell)
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

**No. UDSTAT/ICD/2020-21/ 51 of 2020** **दिनांक : १० डिसेंबर, २०२०**

प्रति,
प्राचार्य/संचालक,

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२०-२१ संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करणेबाबत.**
**संदर्भ : शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे, यांचे उशिस/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२०-२१/८१०५, दिनांक, २/१२/२०२० रोजीचे पत्र.**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय पत्रानुसार आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाकरीता संचालक, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचा AISHE (www.aishe.gov.in), संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांचा MIS (www.dhemis.maharashtra.gov.in) आणि मुंबई विद्यापीठ विकसित यांचा Students on Roll (www.eoffice.mu.ac.in) याबाबतच्या सर्वेक्षणात्मक कार्यक्रमाची प्रती शैक्षणिक वर्षाप्रमाणे ऑनलाईन माहिती पध्दतीने भरणे अत्यावश्यक आहे.

त्याअनुषंगाने, डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांच्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयासाठी उपरोक्त उल्लेखित केलेल्या शैक्षणिक वर्षाप्रमाणे AISHE Portal वर नाव नोंदणी (Registration) करून घेणे अत्यंत आवश्यक व अनिवार्य आहे व **संबंधित नाव नोंदणीचे (Registration) कामकाज दिनांक ७ डिसेंबर, २०२० पासून सुरू झालेले आहे.**

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील संबंधित सर्वेक्षणात्मक कामकाजासाठी एक नोडल अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक आहे. कारण सर्वेक्षणात्मक कार्यक्रमांतर्गत असलेल्या वेबपोर्टलवर महाविद्यालयाचे नाव समाविष्ट करण्यासाठी नेमून दिलेल्या अधिका-याचे भ्रमणध्वनी क्रमांक, महाविद्यालयीन दुरध्वनी क्रमांक, कॉलेज रजिस्ट्रेशन क्रमांक, ई-मेल आयडी, तसेच शासन निर्णय व सलंग्निकरण आदेश (Affiliation Letter) इ. गोष्टी नाव नोंदणी (Registration) करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच याबाबत महाविद्यालयाने आवश्यक ती कार्यवाही न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहिल.

**तरी, उपरोल्लेखित संक्षिप्त बाब लक्षात घेता, सदरचे AISHE, MIS व Students on Roll या सर्वेक्षणात्मक कार्यक्रमाकरीता आपल्या महाविद्यालयाचे नाव नोंदणी (Registration) करून घेण्यासाठी अधिक्षक, Quality Assurance (सांख्यिकी कक्ष), खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे शनिवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२० पर्यत थेट संर्पक साधवा, ही विनंती.**

> टिप्पणी : www.aishe.gov.in या बेबसाईट वर जावून Request for Adding Institute लिंक वर क्लिक करून सदरची उल्लेखित माहिती भरून सोबत शासन निर्णय व सलंग्निकरण आदेश (Affiliation Letter) यांची प्रत्येकी एक प्रत जोडण्यात यावी.

आपला बिश्वासू,

उपकुलसचिव,
(Academic Appointments and
Quality Assurance (AAQA)

Scanned with CamScanner